शपथेला । ! ॥ धन्य ! धन्य ! दिवस तो ! धन्य रोहिडा झाला ! ! ॥ ३ ॥

—: ४ :—

**देवळांत** जमलेलें लोक । होते कित्येक । त्यांत पर एक । होता स्वजनांचा । घात करणारा ! ॥ जणू फुलं फुलली हो छान । दरवळलं वासानं रान । पर लपला आंत दुष्मान । भुजंगम काळा ॥ जणु राजहंसाचा मेळा । रोहिड्यावर जमला । एक पर बगळा । त्यांत होता ठाव नाहीं कोणाला ! ! ॥ सापाचा विळखा चंदनाला । टोळ हिरवा हिरव्या पानाला । वरी वरी दिसतो एकरंग । भिन्न अंतरंग । नित्य पर संग । दोघांचा झाला ! ! ॥ नांव त्यांच होत बाळाजी । सासरा नरसाजी । मेहुणा दादाजी । ज्याचा, तो हा झाला काळ देशाला । त्यानं लिहिला खलिता शाहाला । कीं “ बंडाचा झेंडा उभा झाला । शिवाजीनं नरस वश केला । कितिक मावळा । झेंड्याखालीं जमला ! ॥ रोहिड्याच्या डोंगरावर । ऐका, सरकार ! । असला हा घोर । काल रात्रीला बेत हो झाला ! ! ” ॥ फितुरिचा संचार झाला । तिन त्याला खिळखिळा केला । अभिमान गेला। घातकी बनला ! ॥ चाल ॥ फितुरिनं देश किती मिळाले हो मातीला ॥ किती पापी चांडाळ गेले घोर नरकाला ! ॥नखं दीड वीत बोटाला । लाली लालबुंद डोळ्याला । ते सुळके दांत तोंडाला । दीडहात जीभ टाळ्याला । रक्ताचा टिळा डोक्याला । हाडकांचा सांगाडा—असा आकार झाला ! ! ॥ जिथं जिथं गेली तिथं तिथं नाश तिनं केला ॥ रायगडच्या किल्लयावर गेली, माचा कोसळला ! ॥ झांशोच्या बुरजावर गेली, बुरुज ढांसळला ! ॥ फितुरीच्या जळवा देशाला । सारं रक्त खाऊन देश निस्त्राण केला ! ! ॥ असो ! आतां ऐका गोष्टिला । असं पत्र धाडलं शाहाला । अन् बाळाजी घरीं परतला । मग बोलला काय बायकोला । सांगीन दादानों ! आतां पुढच्या चौकाला ॥ ४ ॥





—: ५ :—

बाळाजी बोले बायकोला । “ ऐक गडे ! बोला । उदयकाळ आला । झाले गेले हाल गरिबीचे । मान येतील सुभेदारीचे । सोन्यामोत्यानं ग फुलवीन । असा योग छान । आला या काळा ॥ शिवाजोचा नाद लागला । तुझ्या ग बापाला । तुझ्या भावाला । मावळा जमविला । बेत त्यांनीं केला ! ॥ रोहिडेश सांब साक्षिला । बंडाचा झेंडा उभा केला । आर्यांचं राज्य स्थापावं । शिवानं बोलावं । थेरड्यानं ऐकावं । चाळा असा केला ! ! ॥

